# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि /1/109/2-340/2020 दिनांक - 22.3.2020

**- परिपत्रक -**

विषय- कोरोना संदर्भात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ दि. २५ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवणेबाबत.

कोरोना संदर्भात उपाययोजना करण्यासाठी देशभर प्रयत्न होत आहेत. कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव/प्रसार विद्यापीठ परिसरात होऊ नये तसेच अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी यांना त्याचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून, या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे शैक्षणिक व प्रशासकीय विभाग येत्या दिनांक २५ मार्च २०२० पर्यंत संपुर्णतः बंद ठेवण्याचे आदेश मा. कुलगुरू यांनी दिले असून या काळात सर्व अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांनी मुख्यालय न सोडता घरी बसूनच (WORK FROM HOME) आवश्यक असेल ती प्रशासकीय व शैक्षणिक कामे करावीत, असे निर्देशित केले आहे.

त्यानुसार, याद्वारे सूचित करण्यात येते की, दिनांक २५ मार्च २०२० पर्यंत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग तसेच विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा पुर्णतः बंद ठेवण्यात येत आहे. दिनांक २५ मार्च २०२० नंतर पुढील परिस्थिती पाहून निर्णय घेऊन त्या प्रमाणे कळविण्यात येईल.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या अधिनस्थ शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सदर आदेश निदर्शनास आणून द्यावेत तसेच सर्व संबंधीतांनी याची नोंद घेऊन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच दिनांक २५ मार्च २०२० पर्यंत विद्यापीठ परिसर बंद राहील याची नोंद सर्व संलग्नित महाविद्यालये, पालक, विद्यार्थी व सर्व संबधितांनी घ्यावी.

डॉ.तुषार देशमुख<br>
कुलसचिव,<br>
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

प्रत -

1) सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख
2) मानद संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
3) प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये